गँगस्टर गोल्डीला 'मोस्ट वॉंटेड'मधून वगळले

अमृतसर : वृत्तसंस्था

कॅनडा सरकारने भारताने मोस्ट वॉंटेड म्हणून घोषित केलेल्या यादीतून गँगस्टर गोल्डी बरार याचे नाव वगळले आहे. या निर्णयामुळे भारत आणि कॅनडामधील तणाव आणखी वाढण्याची शक्यता असल्याचे मत कॅनडातील माजी भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा यांनी मांडले आहे. कॅनडामध्ये लपलेल्या गोल्डीवर पंजाबी गायक सिद्धू मुसेवालाच्या हत्येचा आरोप आहे. याप्रकरणी भारत सरकारने त्याच्या विरोधात इंटरपोल रेड नोटीसही जारी केली होती.

विधानसभेतही काही ठिकाणी सांगली पॅटर्न ?

मविआत खदखद; काँग्रेसची भूमिकाही आक्रमक

नवी दिल्ली : प्रशांत वाघाये

महाविकास आघाडीमध्ये योग्य जागावाटप न झाल्यास पुन्हा एकदा काही जागांवर सांगली पॅटर्न राबवला जाण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यातील मिरज विधानसभेचाही त्यात समावेश आहे. ठाकरे गटाच्या ताठर भूमिकेमुळे काँग्रेसही आक्रमक झाल्याचे सांगण्यात येते.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये अजूनही चर्चा सुरूच आहे. यामध्ये काँग्रेसची ताकद असलेल्या जागांवरही शिवसेना ठाकरे गटाने दावा ठोकला आहे. त्यापैकी काही जागा ठाकरे गटाला जाहीरही झाल्या आहेत. काँग्रेसमध्ये त्यामुळे नाराजी आहे, ज्या ठिकाणी काँग्रेसला आपण जिंकूच ही खात्री आहे अशा काही निवडक ठिकाणी काँग्रेसकडून सांगली पॅटर्न राबवला जाण्याची शक्यता आहे. या पॅटर्नमध्ये प्रामुख्याने पुन्हा एकदा सांगली जिल्ह्यातील मिरज विधानसभेचा समावेश असू शकतो.

मिरजेच्या जागेवरून वाद

मिरज विधानसभेची जागा शिवसेना ठाकरे गटाच्या वाट्याला गेल्याचे समजते. यानंतर काहीही झाले तरी ही जागा लढवण्यावर काँग्रेस ठाम आहे, तशी भूमिका स्थानिक काँग्रेस नेत्यांनी वरिष्ठांना कळवली आहे. वाटाघाटीत जागा काँग्रेसला सुटली तर ठीक नाही तर लोकसभेप्रमाणे सांगली विधानसभेतही 'सांगली पॅटर्न' राबवू, असा आक्रमक पवित्रा स्थानिक नेतृत्वाने घेतला आहे.

काँग्रेस पक्षातील स्थानिक नेत्यांनीच काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना हा इशारा दिल्याचे समजते. त्यामुळे ही जागा काँग्रेसला मिळवण्यासाठी वरिष्ठांचे प्रयत्न सुरू आहेत.

५-७ जागांवर मैत्रीपूर्ण लढत?

- महाविकास आघाडीमध्ये ५ ते ७ जागांवर शेवटपर्यंत तिढा सुटणार नसल्याचे समजते. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत तोडगा न निघाल्यास या जागांवर मैत्रीपूर्ण लढत होण्याची दाट शक्यता आहे. यात विदर्भ, मुंबई, पश्चिम महाराष्ट्रातील जागा असू शकतात.

जोगेश्वरीमध्ये वायकरांच्या डोकेदुखीत भर

भाजपाच्या माजी नगरसेविकेने फुंकले रणशिंग; वरिष्ठ नेत्यांचा पाठिंबा ?

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मागणी नंतरही जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघ शिवसेना शिंदे गटाला दिल्यामुळे भाजपचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी नाराज झाले आहेत. या मतदारसंघातून भाजपाच्या माजी ज्येष्ठ नगरसेविका उज्वला मोडक यांना निवडणूक रिंगणात उतरून कार्यकर्त्यांनी शिवसेना विरुद्ध रणशिंग फुंकले आहे.

या मतदारसंघात खासदार रवींद्र वायकर यांच्या पत्नीला उमेदवारी देण्यात आली आहे. हा मतदार संघ शिवसेनेला न देता तो भाजपाने आपल्याकडे घ्यावा अशी मागणी या विधानसभेतील भाजपा पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. फडणवीस यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत हा मतदार संघ भाजपाला मिळावा असा आग्रह धरला. पण शिवसेनेचे खासदार रवींद्र वायकर यांनी हा मतदार संघ सोडण्यास नकार दिला. अखेर शिवसेना-भाजप नेत्यांच्या वाटाघाटीत हा मतदारसंघ शिवसेनेला देण्यात आला. त्यामुळे भाजप कार्यकर्ते नाराज आहेत. पक्षाकडून कारवाई होईल, याची तमा न बाळगता भाजपा कार्यकर्त्यांनी उघडपणे वायकर यांच्या कुटुंबात दिलेल्या उमेदवारीला जोरदार विरोध केला आहे.

घासून नाही ठासून येणार.. लोकांना बदल हवाय.. युतीचा सन्मान आम्ही ठेवतोच, पण उमेदवार पैसा खर्च करणार म्हणून वायकर यांच्या बायकोला उमेदवारी देणे कितपत योग्य आहे. ही न पटणारे राजकीय घटना आहे. म्हणूनच बदल हवाय जोगेश्वरीमध्ये भावी आमदार उज्वला मोडक यांना जाहीर समर्थन.. आमचं ठरलंय कामाला नेक जोगेश्वरीची लेक.. उज्वला मोडक असे फलक व सोशल मीडियावरून जाहिरातबाजी भाजपा कार्यकर्त्यांनी सुरू केली आहे. मोडक यांच्या अपक्ष उमेदवारीला भाजपातील काही वरिष्ठ नेत्यांचा पाठिंबा असल्याचेही सांगण्यात येत आहे. या भांडणांमध्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे टेन्शन मात्र हलके झाले आहे.

मोडक २०१४ मध्ये होत्या निवडणूक रिंगणात

- उज्वला मोडक या भाजपाच्या ज्येष्ठ नगरसेविका असून २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाने त्यांना उमेदवारी दिली होती. यावेळी शिवसेनेचे रवींद्र वायकर उमेदवार होते. या मतदारसंघात वायकर यांचे प्राबल्य असतानाही मोडक यांनी दुसऱ्या क्रमांकाची ४३,८०५ मते घेतली. म्हणजेच एकूण मतदानाच्या २७.१७ टक्के मते त्यांना मिळाली होती.

भाजपला का हवा होता मतदारसंघ

- जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघात रवींद्र वायकर सलग १५ वर्षे आमदार असतानाही लोकसभा निवडणुकीत या मतदारसंघात वायकर यांचे मताधिक्य घटले. याला वायकर यांच्यावर असलेली येथील मराठी मतदार व शिवसेनेची नाराजी कारणीभूत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही याची पुनरावृत्ती होईल, यामुळे हा मतदारसंघ भाजपला मिळावा, यासाठी गेल्या एक ते दीड महिन्यापासून भाजप कार्यकर्ते प्रयत्नशील होते.

मुंबईचे रणांगण विधानसभा-२४

मध्य रेल्वे

मुंबई विभाग

विविध स्थानकांत सिग्नलिंग कामे

खुली निविदा सूचना

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अॅन्ड टी), १ ला मजला, पार्सल कार्यालय इमारत, प्लॅटफॉर्म क्र. १४ व १५ च्या वर, मध्य रेल्वे, मुंबई सीएसटी - ४०० ००१ हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता व त्यांच्या वतीने नामांकित कंत्राटदारांकडून खुल्या निविदा मागवीत आहेत. निविदा सादरीकरणाची तारीख व वेळ २१.११.२०२४ रोजी दु. ३.०० पर्यंत अशी असून निदा त्याच दिवशी दु. ३.१५ वाजता उघडण्यात येतील. **कामाचे वर्णन :** मुंबई विभागातील विविध स्थानकांत अभियांत्रिकी शिल्लक कामांसंदर्भात सिग्नलिंग कार्य. **निविदा सूचना क्र. : CR/BB/S&T/South/2024/58 अंदाजित मूल्य :** रु. १.०७ कोटी, **उघडण्याची तारीख :** २१.११.२०२४, **इरठे :** रु. २०३७००.००, **वैधता :** ६० दिवस, **कार्यपूर्तता कालावधी :** १२ महिने. सदर निविदा ही सार्वजनिक प्रापण धोरण (मेक इन इंडिया) आदेश, २०१७ दि.१५.०६.२०१७ अनुपालक आहे. निविदांचा संपूर्ण तपशील मध्य रेल्वेची अधिकृत वेबसाइट www.ireps.gov.in वर उपलब्ध आहे. संपूर्ण निविदा दस्तावेज वेबसाइटवरून डाऊनलोड करता येऊ शकतील. निविदांचा संपूर्ण तपशील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (एस अॅन्ड टी) यांचे कार्यालय, मुंबई सीएसटी येथील ''सूचना फलकावरही'' उपलब्ध आहे.

डीआरएम (एस अॅन्ड टी), सीएसटीएम

SUN 499

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

भारताने पाकमुळे रोखली तुर्कीची एन्ट्री

बर्लिन : वृत्तसंस्था

काश्मीरसंदर्भात पाकिस्तानच्या कलाने भूमिका घेणे तुर्कीला भोवले आहे.

पाकिस्तानप्रमाणेच तुर्कीनेही ब्रिक्स देशांच्या समूहात सदस्यत्वासाठी अर्ज केला होता; पण तो मान्य करण्यात आलेला नाही.

भारतामुळेच ब्रिक्समध्ये तुर्कीची एंट्री होऊ शकलेली नाही, असे वृत्त जर्मनीतील 'बिल्ड' या वर्तमानपत्राने दिले आहे.

राहुल नार्वेकरांकडे १५३ कोटींहून अधिक संपत्ती

मुंबईः पुढारी वृत्तसेवा

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची एकूण संपत्ती १५३ कोटींहून अधिक असून त्यांचे कौटुंबिक एकत्रित वार्षिक उत्पन्न १ कोटी ३९ लाखांहून अधिक आहे.

राहूल नार्वेकर यांचे २०२३-२४ या आर्थिक वर्षातील उत्पन्न ४० लाख २१ हजार ३३० रूपये तर त्यांची पत्नी सरोजिनी नार्वेकर यांचे याच काळातील वार्षिक उत्पन्न ९९ लाख ४९ हजार ६८० रूपये इतके आहे.

राहुल नार्वेकर यांच्यावर १७ कोटी रुपयांचे कर्ज तर ६६ कोटी रुपयांचे कर्ज पत्नीवर आहे. त्यांच्याकडे ४ चारचाकी गाड्या असून यात मर्सिडीज बेंझ, इनोव्हा क्रिस्टा, महिंद्रा एक्ययूव्ही आणि फॉर्च्युनरचा समावेश आहे. राहुल नार्वेकर यांच्याकडे १६० ग्राम सोने असून त्याचे बाजारमूल्य जवळपास ११ लाख ६८ हजार रुपये तर पत्नीकडे जवळपास ६६० ग्राम सोने असून त्याची किंमत ४८ लाखांच्या घरात आहे.

राहुल नार्वेकर यांची ७ कोटी १७ लाख तर पत्नीच्या नावे ८ कोटी ५३ लाखांची जंगम मालमत्ता आहे. राहुल नार्वेकर यांच्या नावे जवळपास २८ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता तर पत्नीच्या नावे ८५ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता आहे.

नागपूर : उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सोबत चंद्रशेखर बावनकुळे, नितीन गडकरी, जोगेंद्र कवाडे आदी.

भाजप सत्तेत असेपर्यंत आरक्षणाला कुणीही हात लावू शकणार नाही

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विरोधकांवर टीका

नागपूर : पुढारी वृत्तसेवा

काँग्रेसने नेहमीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विरोध केला. मात्र भारतात संविधान आहे आणि भाजप सत्तेत आहे तोवर आरक्षणाला कुणीही हात लावू शकणार नाही, असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. दिशाहीन विरोधकांचे भवितव्य अंधकारमय असल्याचेही ते म्हणाले.

विधानसभा निवडणुकीसाठी नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राहुल गांधी यांच्या आरक्षण संदर्भात भूमिकेचे समर्थन केल्याबाबत फडणवीस म्हणाले, पंडित नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि आता राहुल गांधी देखील तीच भूमिका पुढे नेत आहेत. पटोले हे त्यांचेच चेले आहेत असे फडणवीस म्हणाले.

डायरी काय कुणीही लिहितो?

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या पुस्तकाबाबत छेडले असता डायरी काय कुणीही लिहितो, मनाने कादंबरी कुणीही लिहितील. त्याला अर्थ नाही. मुळात हायकोर्ट, सुप्रीम कोर्टाने काय निरीक्षण नोंदवले ते महत्त्वाचे, असेही फडणवीस म्हणाले.

मनात भगवा रंग, आवडतात सगळे रंग

- अजित पवार यांच्याप्रमाणेच पिंक जॅकेट घातल्याबद्दल छेडले असता फडणवीस म्हणाले, मी हे जॅकेट प्रथमच घातलेले नाही. नेहमीच घालतो. मनात भगवा रंग असला तरी सर्व रंग मला आवडतात.

'मविआ'पुढे नवे संकट

पान १ वरून... आघाडीचे जागावाटप उद्यापर्यंत जाहीर झाले नाही तर समाजवादी पक्ष स्वबळावर निवडणूक लढवेल. समाजवादी पक्षाचे ५ जागांवर उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. आम्हाला ५ जागा मिळाव्यात ही विनंती मी शरद पवारांकडे केली. आम्हाला तितक्या जागा न मिळाल्यास आम्ही २५ जागांवर स्वतंत्रपणे लढू, अशी घोषणा अबू आझमी यांनी पवारांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना केली.

पवारांनी त्यांना वाट पाहण्याचा सल्ला दिला आहे. समाजवादी पक्षाने २२ तारखेला पाच जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामध्ये धुळे शहर, मानखुर्द शिवाजी नगर, भिवंडी पूर्व, भिवंडी पश्चिम आणि मालेगावचा समावेश आहे. ही घोषणा करून त्यांनी मविआवर दबाव वाढविला आहे.

जागावाटपाच्या घोळात काँग्रेसच्या हक्काच्या जागा अडकल्या

महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या घोळात काँग्रेसच्या हमखास निवडून येणाऱ्या सात जागा अडकल्या आहेत. या जागांवरील दावा सोडण्यास ठाकरे गट आणि शरद पवार गटाने नकार दिला आहे. तसेच रामटेक, भायखळा, वांद्रे पूर्व या जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत.

मुंबई, विदर्भासह राज्यातील काही जागांवरील दावे सोडण्यास महाविकास आघाडीतील पक्ष तयार नाहीत. त्यामुळे जागावाटपाचे घोडे अडले आहे. पण जागांवरील दावा सोडा, यासाठी काँग्रेसचे मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड आणि विदर्भातील काँग्रेसचे नेते सुनील केदार आणि राजेंद्र मुळक यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची व नंतर संजय राऊत यांचीही भेट घेतली. मात्र त्यांना या जागांवरील दावा सोडण्यास स्पष्ट नकार दिला आहे. ठाकरे गटाने मनोज जामसुतकर (भायखळा), वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), विशाल बरबटे (रामटेक) यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

ठाकरे या जागांबाबत फेरविचार करतील, अशी अपेक्षा काँग्रेसच्या नेत्यांनी व्यक्त केली आहे. दक्षिण नागपूर येथे विद्यमान आमदार मोहन मते भाजपचे आहेत. काँग्रेसचे गिरीश पांडव, अतुल लोंढे हे या जागेसाठी दावा करत आहेत . २०१९ मध्ये केवळ ४ हजार मतांनी काँग्रेसचे पांडव येथे पराभूत झाले होते. मात्र ठाकरे गटाला ही जागा हवी असल्याने काँग्रेसने अद्याप येथील उमेदवार जाहीर केलेला नाही. भंडाराच्या जागेवर ठाकरे गट नरेंद्र पहाडे यांच्यासाठी प्रयत्न करत आहे. ते नागपूरमधील आहेत. भंडारा मधून लढण्याची तयारी करत आहेत. परंतु भंडारा काँग्रेसचा गड आहे. मात्र ठाकरे गटाने हट्ट सोडलेला नाही. काँग्रेसकडून पूजा ठवकर, प्रेम सागर गणवार यांच्या नावाचा विचार केला जात आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील दोन जागांवर ठाकरेंचा दावा आहे. वरोरा भद्रावती या जागेवर काँग्रेसकडून खा. प्रतिभा धानोरकर या आपले बंधू प्रवीण काकडे यांच्या उमेदवारीसाठी आग्रही आहेत तर पक्षाने केलेल्या सर्वेक्षणात डॉ. चेतन खुटेमाटे हे आघाडीवर आहेत.

या जागेवर ठाकरेंचे जिल्हाध्यक्ष मुकेश जीवतोडे यांनी दावा केला आहे. बल्लारपूरची जागाही उद्धव ठाकरे यांना ही जागा हवी आहे. पवार गटानेही काही जागांवरील दावे सोडलेले नाहीत. त्यामुळे आघाडीची गाडी अजून अडकलेली आहे.

केनरा बैंक Canara Bank

सिंडिकेट Syndicate

स्ट्रेस्ड् ॲसेट मॅनेजमेंट ब्रॅन्च :
सर्कल ऑफिस इमारत, ८ वा मजला,
बी विंग, सी-१४, जी-ब्लॉक, वान्द्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्र पूर्व, मुंबई - ४०० ०५१.
दूर. : +९१ २२- २२६९ २३८७८२, ८७४४, ८७७१ ई-मेल : cb15550@canarabank.com

संदर्भ : CB/15550/SAM/JUHI/444/2024/DA **दिनांक : १९.१०.२०२४**

प्रति,

कर्जदार :- मे. जूही इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय : गाव : तिरुलडीह, पी.ओ. घाट दुलमी, पी.एस. : चांदील, जिल्हा सेराईकेला- खरसावन, झारखंड- ८३२ ४०१ व **मे. जूही इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, कॉर्पोरेट कार्यालय :** १४१, ए विंग, मित्तल कोर्ट, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१, (महाराष्ट्र).

हमीदार :-

श्री. मिथिलेश पांडये, ३०३, पी.पी.को.पौंड, पी.एस.० हिंदपिरी, रांची - ८३४००१, झारखंड व घर क्र. २१२, रोड क्र. १, अशोक नगर, पी एस अर्गोरा, रांची- ८३४००१, झारखंड.

श्री. संजय कुमार शहा, ताजमहाल, क्लब रोड, रांची- ८३४००१, झारखंड.

श्री. अखिलेश पांडे (मे. डिव्हाईन अलॉयज अॅन्ड पॉवर को. लि., संचालक), ताजमहाल, क्लब रोड, रांची- ८३४००१, झारखंड.

श्री. राजेश पांडे (मे. डिव्हाईन अलॉयज अॅन्ड पॉवर को. लि., संचालक), ताजमहाल, क्लब रोड, रांची- ८३४००१, झारखंड.

श्रीमती नूतन पांडे, ४२४ बी, अशोक नगर, अशोक नगर पी.एस., अर्गोरा, रांची - ८३४००२. व १, डिव्हाईन हाऊस क्लॅब रोड, सुजाता चौकाजवळ, रांची - ८३४००१, झारखंड.

मे. प्रोग्रेसिव्ह ट्रेडकॉम प्रा.लि., १३१/१७, एन.एस.सी. बोस रोड, तळमजला, कोलकत्ता - ७०००४०.

मे. त्रिवेणी इन्फ्राटेक प्रा. लि., डिव्हाईन हाऊस क्लॅब रोड, रांची, झारखंड - ८३४००१.

विषय : सीक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (यापुढे कायदा म्हणून उल्लेखित) च्या अनुच्छेद १३(८) अंतर्गत विमोचनाचा अधिकार वापरण्याकरिता जारी सूचना.

अधोहस्ताक्षरित - कॅनरा बँक एसएएम शाखा, मुंबई, महाराष्ट्र यांचे प्राधिकृत अधिकारी (यापुढे प्रतिभूत धनको म्हणून उल्लेखित) कायद्याअंतर्गत नियुक्त यांनी कायद्याचे अनुच्छेद १३ (८) सहवाचन सरफैसी नियमाचे नियम ८ (६) अंतर्गत तुम्हाला खालीलप्रमाणे सूचना जारी केली आहे :

तुम्हाला माहिती आहे की प्रतिभूत धनकोंनी कायद्याचे अनु. १३ (२) अंतर्गत कर्जदार/संस्था **मे. जूही इंडस्ट्रीज प्रा. लि. व श्री. मिथिलेश पांडे, श्री. संजय के शाह, श्री. अखिलेश पांडे, श्री. राजेश पांडे, श्रीमती नूतन पांडे, मे. प्रोग्रेसिव्ह ट्रेडकॉम प्रा. लि., मे. त्रिवेणी इन्फ्राटेक प्रा.लि.** - गहाणकर्दार व हमीदार (वरील निर्देशित नावे) यांना थकित रक्कम रु. १३९,६८,९६,६६३.७० (रु. एकशे एकोणचाळीस कोटी अडुसष्ट लाख शहाण्णव हजार सहाशे त्रेसष्ट व सत्तर पैसे मात्र) व त्यावरील व्याज रकमेचे प्रदान संबंधित सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश दिले होते. कर्जदार / संस्था, गहाणवटदार व हमीदार (वरील निर्देशित नावे) यांनी वरील मागणी सूचनेत नमूद केलेल्या रकमेचे प्रदान करण्यात कसूर केली असल्याने प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ताबा सूचना दि. ०७.०४.२०२१ मध्ये विवरणीत प्रतिभूत संपत्तीचा कायद्याचे अनुच्छेद १३ (४) अंतर्गत प्रतिकात्मक ताबा घेतला आहे. पुढे, सदर प्रतिकात्मक/प्रत्यक्ष ताबा सूचना मुंबईबिझनेस स्टॅन्डर्ड व पुढारी वर्तमानपत्रांत दि. १३.०४.२०२१ रोजी व रांची प्रभात खबर व टाइम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रांत दि.१३.०४.२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सरफैसी कायदा,२००२ च्यातरतुदी सहवाचन सरफैसी नियमाच्या नियम ८ (६) च्या अनुपालनांतर्गत तुम्हाला याद्वारे शेवटची व अंतिम संधी देण्यात येत आहे की, तुम्ही सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत दि.०७.१२.२०२० रोजीनुसार रक्कम रु. १३९,६८,९६,६६३.७० (रु. एकशे एकोणचाळीस कोटी अडुसष्ट लाख शहाण्णव हजार सहाशे त्रेसष्ट व सत्तर पैसे मात्र) अधिक पुढील व्याज, मूल्य व खर्चरकमेचे संपूर्ण प्रदान करावे व प्रतिभूत धनकोच्याताब्यात असलेली प्रतिभूत संपत्ती सोडवून घ्यावी अन्यथा कायद्यांतर्गत वर्तमानपत्रांमध्ये कायद्यांतर्गत प्रकाशित विक्री सूचनेनुसार प्रतिभूत संपत्तीची विक्री करण्यासाठी खालीलपैकी कोणतीही एक पद्धत वापरण्यात येईल :

१) अशा प्रकारच्या प्रतिभूत संपत्तीचा व्यवहार करीत असलेल्या व्यक्तींकडून किंवा संपत्ती खरेदी करू इच्छिणाऱ्या व्यक्तींकडून देकार प्राप्त करून किंवा २) जनतेकडून निविदा मागवून किंवा ३) ई-लिलाव पद्धतीच्या माध्यमातून लिलावासहित जाहीर लिलाव आयोजितकरून किंवा ४) खाजगी कराराद्वारे.

कायद्याच्या अनुच्छेद १३ (८) अंतर्गत तुम्ही वर्तमानपत्रात विक्री सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून कोणत्याही वेळी प्रतिभूत संपत्ती सोडवून घेऊ शकता यामध्यकसूर झाल्यास, कायद्याचे अनुच्छेद १३ (८) नुसार गहाण मालमत्ता सोडवून घेण्याचा हक्क रद्दबातल ठरेल.

सदर सूचना ही संबंधित कायदा/अन्य लागू कायद्यांतर्गत प्रतिभूत धनकोंकडे उपलब्ध अन्य सर्व हक्कांना बाधा न आणता आहे.

धन्यवाद
कॅनरा बँक
प्राधिकृत अधिकारी

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **मे. इंटिग्रल इंडस्ट्रीज प्रा. लि.** हे खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत स्थावर मालमत्तेचे कायदेशीर व संपूर्ण पट्टेदार आहेत.

मूलतः खालील निर्देशित मालमत्ता ही सिडकोद्वारे मे. एम. पी.स्टील कॉर्पोरेशन-त्यांचे भागीदारांच्या माध्यमातून यांना पट्टेदारीने देण्यात आली होती व नंतर मे. एम.पी.स्टील यांचा मे.एमपी रिसायकलिंग कंपनी प्रा. लि. द्वारेताबा घेण्यात आला ज्यांना सिडकोने हस्तांतरण आदेश जारी केला होती, असे घोषित करण्यात येत आहे की, सिडको आणि मे. एम. पी.स्टील कॉर्पोरेशन चे भागीदार यांच्यादरम्यानचा नोंदणीकृत भाडेकरार दि.२४.०१.१९९७, नोंदणीकरण क्र. पी/२३५/१९९७, दि. ३०.०१.१९९७ धारक तसेच सिडकोद्वारे मे. एमपी रिसायकलिंग कंपनी प्रा. लि.यांच्या नावे जारी मूळ हस्तांतरण आदेश हे दस्तावेज मे. इंटीग्रल इंडस्ट्रीज प्रा.लि. यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या ताब्यातून गहाळ झाले आहेत आणि मूळ दस्तावेज शोधण्याचा प्रयत्न करूनही ते सापडलेले नाही व यासंदर्भात संबंधित पोलीस स्टेशन येथे गहाळ तक्रारही दाखल करण्यात आली आहे.

कोणाही व्यक्तीस वरील निर्देशित मूळ दस्तावेज सापडल्यास अधोहस्ताक्षरितांना सूचित करावे तसेच कोणाही व्यक्तीचा अनुसूचीतील निर्देशित मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात उत्तराधिकार, हिस्सा, विक्री, गहाण, भाडेकरार, धारणाधिकार, अनुज्ञप्ती, भेट, ताबा वा भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हक्क असल्यास किंवा वरील करार दस्तावेज असल्यास त्यांनी अधोहस्ताक्षरितांना खालील निर्देशितपत्त्यावर त्यांच्या दाव्याचे स्वरूप, काही असल्यास, नमूद करून, कागदोपत्री पुराव्यासहित सदर सूचनेच्यातारखेपासून ७ दिवसांच्या आत सूचितकरावे अन्यथा अनुसूचीत विवरणीत मालमत्ता वा तिच्याकोणत्याही भागाविरोधातील वा वरील वा संदर्भातील कोणतेही दावे हे जमा केलेले, अधिस्थागित व परिस्थागित समजण्यात येतील.

मालमत्तेची अनुसूची

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - मोकळा भूखंड क्र. ७३५, मोजमापित ४५० चौ. मी., मुंबई, महानगर क्षेत्र, आयर्न अॅन्ड स्टील मार्केट कमिटी, रस्ता क्र. ६, सेक्टर क्र. केडब्ल्यूसी, कळंबोली स्टील वेअरहाऊसिंग कॉम्प्लेक्स, गाव कळंबोली, तालुका पनवेल,जि. रायगड येथील,चतुःसीमा : पूर्वेस : रस्ताक्र. ७३६, उत्तरेस : प्लॉटक्र. ७६२, दक्षिणेस : रस्ता क्र. ६ व पश्चिमेस : प्लॉट क्र. ७३४.

सही/- **मे. साई कन्सल्टन्सी सर्व्हिसेस**
वकील, उच्च न्यायालय, मुंबई
कक्ष क्र. २०१, २ रा मजला, जास्मिन गार्डन, सीएचएसएल
जांभळी नाका, हॉटेल टाइम्स स्क्वेअरजवळ, ठाणे (प.) - ४०० ६०१.
९८२१००६३८४/९१६७६७५३२८/२९

ठिकाण : मुंबई
दिनांक : २६.१०.२०२४

PUBLIC NOTICE

Notice is hereby given for the information of public that, we are **Dnyandeep Co-operative Credit Society Ltd., Mumbai,** incorporated under Maharashtra Co-operative Societies Act, 1960, Admin Office : 2nd Floor, Sai Enclave, Hariyali Village, Vikhroli (E), Mumbai – 400 083 have agreed to purchase from Smt. Ladabai Maganlal Chheda, Mr. Rajesh Maganlal Chheda, Mr. Vasantlal Maganlal Chheda and Mr. Mansukh Maganlal Chheda :1) Office No. 02, 1st Floor, Vishal Residency Co-Operative Housing Society Ltd., Plot No – 18, Sector – 21, Ulawe, Navi Mumbai, Ta. Panvel, Dist. Raigad, admeasuring Carpet of 706 Sq. Ft. (Saleble Area 1200 Sq. Ft.)

All persons, Government Authorities, Bank/s, Financial Institution/s. etc. having any claim against or to the said flat of or any part thereof by way of mortgage, gift, sale, Possession, inheritance, lease, license, lien, exchange, maintenance, charge, trust, agreement, share, easement or otherwise howsoever or whatsoever are required to make the same known in writing to the undersigned at his office at : **Dnyandeep Co-operative Credit Society Ltd., Mumbai, Sai Enclave, 2nd Floor, Hariyali Village, Vikhroli (E), Mumbai 400 083. Contact Mob. No. 9766400701/02, and email id – adminoffice@dnyandeep.co.in** within 14 days the date hereof, failing which it will be presumed and/or deemed that there are no such claims and if any, the same have been waived or abandoned.

Place:-Mumbai
Date :-25.10.2024

Sd/-
Adv. R. M. Pise,
Dy. Chief Manager

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की मे. हितेश अपार्टमेंट को-ऑप. हौ. सोसायटी लि. CTS. NO-273/C(2718.80 sqm.) असल्फा व्हिलेज, घाटकोपर (पश्चिम), मुंबई-४०००८४, यांचे कडून वरील नमूद पत्त्यावरील, सोसायटी इमारत (G+४) रिडेव्हलपमेंटसाठी ऑफर मागविण्यात आल्या होत्या त्यापैकी एका डेव्हलपरची निवड करून सदर सोसायटी इमारत रिडेव्हलपमेंटसाठी सभासद/कमिटीकडून सर्वांनी सहमती दर्शवली आहे. कोणतीही व्यक्ती, सभासद अथवा डेव्हलपर, वित्तीय संस्था, बँक आणि अन्य ज्यांना वरील वर्णन केलेल्या सोसायटी इमारत रिडेव्हलपमेंटसंदर्भात, देवाण घेवाण, रिडेव्हलपमेंट हक्क किंवा अन्य काही हरकत असल्यास त्यांनी याबाबत लेखी स्वरूपात हरकत/सूचना कागदोपत्री पुरव्यासहित खालील पत्त्यावर या सूचनेच्या प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा कोणताही अशा प्रकारचा दावा/हक्क/आक्षेप/ हितसंबंध किंवा हरकत नाही असे समजून रिडेव्हलपमेंट करार केला जाईल आणि ते सोडून देण्यात आले आहेत किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

सही/-
अध्यक्ष/सचिव/खजिनदार
हितेश अपार्टमेंट को-ऑप. हौ. सोसायटी लि.
CTS. NO-273/C, असल्फा व्हिलेज,
घाटकोपर, (पश्चिम), मुंबई -४०००८४,

अॅड. वाय ए. मोदी

जाहीर समन्स

वडूज येथील मे. सिव्हील जज्ज सि.डि. सो यांचे न्यायालयात

पु.जे.ता. ११/११/२४
स्पे.दि.मु.नं. १२/२०१८
नि.८३

श्रीमती लक्ष्मी विठ्ठल शेंडगे वगैरे ------- **वादी**
विरुद्ध
नामदेव आकोबा शेंडगे वगैरे -------- **प्रतिवादी**

ज्याअर्थी सदरील वादी यांनी प्र.वादी यांच्या विरुद्ध वडूज येथील मे. सिव्हील जज्ज सि.डी. सो यांचे कोर्टात मौजे चितळी तसेच नवी मुंबई येथील मिळकतींचेबाबत वाटपाचा दावा दाखल केलेले आहे. सदरकामी प्र. वादी नं ७) श्रवण कुमार सिंग, रा. ई. डब्ल्यू. एस. चाळ नं १ प्लॉट नं ५ए, तुर्भे गांव सेक्टर २४, तुर्भे नवीमुंबई, ८) संजीव शंभुनाथ वैश्य, रा. ई. डब्ल्यू. एस. रूम नं इ - ६ प्लॉट नं ३५ए, तुर्भे गांव सेक्टर २४, तुर्भे नवीमुंबई, ता.जि. ठाणे, ९) विलास तुकाराम रोकडे, रा. ए/४३/२, सेक्टर २१, तुर्भे नवी मुंबई, १०) सिध्दे विलास रोकडे, रा. ए/४३/२, सेक्टर-२१, तुर्भे नवी मुंबई, ११) महमंद तारिफ खान, रा. प्लॉट नं ११०, शॉप नं १, सेक्टर नं २३, तुर्भे, नवी मुंबई, १२) खुर